ynm/Lm 27

जा.क्र.वि.शा./राजकीय / ६५६६ /२०१७
पोलीस उप आयुक्त विशेष शाखा,कार्यालय पुणे
दिनांक :- १२/०९/२०१७

**विषय :- महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३६ प्रमाणे आदेश.**

**आदेश**

ज्याअर्थी महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग, पत्र क्रमांक रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.४२/का.५ दि.०६/०९/२०१७ च्या आदेशान्वये बृहन्मुंबई,पुणे,नागपूर व कोल्हापूर या ०४ महानगरपालिकांचा रिक्त पदांसाठीचा पोटनिवडणूक ऑक्टोबर २०१७ कार्यक्रम जाहीर केलेला आहे. व त्यात पुणे महानगरपालिकेच्या प्रभाग २१ (अ) ची पोटनिवडणूक होणार आहे. त्याची आचारसंहीता दिनांक ०६/०९/२०१७ रोजीपासून ते निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अस्तित्वात राहील. पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील कोरेगाव पार्क, मुंढवा, हडपसर या पोलीस स्टेशन हददीतील प्रभाग २१ (अ) कोरेगाव पार्क-घोरपडी या प्रभागाची पोटनिवडणूक होणार असून, दिनांक ११/१०/२०१७ रोजी मतदान व दिनांक १२/१०/२०१७ रोजी मतमोजणी होणार आहे.

आणि ज्याअर्थी, सदरची सार्वत्रिक निवडणूक ही सुरळीतपणे व शांततेत पार पाडण्यासाठी पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात कायदा व सुव्यवस्था राखणे आवश्यक आहे

त्याअर्थी, मी रविंद्र कदम, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३६ प्रमाणे मिळालेल्या अधिकारानुसार कोरेगाव पार्क, मुंढवा, हडपसर या पोलीस ठाणे स्वाधीन अधिकारी यांना खालील नमूद केलेप्रमाणे लेखी अगर तोंडी आदेश देण्याचे अधिकार प्रदान करीत आहे.

**अ**. रस्त्यावरून जाणाऱ्या जमावाचे अगर मिरवणूकीत व्यक्तीचे वागणे अगर कृत्याबाबत आदेश देणे.

**ब**.. ज्या मार्गाने मिरवणूक किंवा जमाव जाईल अगर जाणार नाही ती वेळ व मार्ग निश्चित करणे.

**क**. सार्वजनिक ठिकाणी अगर सार्वजनिक करमणूकीच्या कार्यक्रमाच्या वेळी वापरण्यात येणाऱ्या लाऊड स्पिकरच्या ध्वनीची तिव्रता निश्चित करून दिलेली वेळ यावर नियंत्रण करणे.

**ड**. मिरवणूकीचे प्रचाराच्या निमित्ताने जाहीर सभा घेण्याचे ठिकाण दिनांक व वेळ याबाबत नियंत्रण करणे.

हा आदेश पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील कोरेगाव पार्क, मुंढवा, हडपसर या पोलीस स्टेशनचे हद्दीत दि.१५/०९/२०१७ चे रात्रौ ००.०१ वा.पासून ते दिनांक १२/१०/२०१७ चे २४.०० वा.पर्यंत लागू राहील.

सदरचा आदेश भंग करणारी व्यक्ती महाराष्ट्र पोलीस ॲक्ट १९५१ च्या कलम १३४ नुसार शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश माझे सही शिक्क्यानिशी आज दिनांक १५ /०९/२०१७ रोजी दिला आहे.

प्रभाग २१ अ

जा.क्र.वि.शा.पोउआ/राजकीय / ८५६९/२०१७
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा-१,कार्यालय,
दिनांक :- १५/०९/२०१७

विषय :- **फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश.**

आदेश

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग पत्र क्र. रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.४२/का.५ दि.०६/०९/२०१७ च्या आदेशान्वये बृहन्मुंबई,पुणे,नागपूर व कोल्हापूर या ०४ महानगरपालिकांचा रिक्त पदांसाठीचा पोटनिवडणूक ऑक्टोबर २०१७ कार्यक्रम जाहीर केलेला आहे. व त्यात पुणे महानगरपालिकेच्या प्रभाग २१ (अ) ची पोटनिवडणूक होणार आहे. पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील कोरेगाव पार्क, मुंढवा, हडपसर, बंडगार्डन या पोलीस स्टेशन हददीतील प्रभाग २१ (अ) कोरेगाव पार्क-घोरपडी या प्रभागाची पोटनिवडणूक होणार असून, दि. १६/०९/२०१७ ते दि. २७/०९/२०१७ या दरम्यान नामनिर्देशन पंत्र दाखल करणे, नामनिर्देशन पत्राची छाननी करणे व उमेदवारी मागे घेणे इत्यादी कामे खालील नमूद ठिकाणी चालणार आहे.

| मनपा | प्रभाग क्रमांक | ठिकाण |
|---|---|---|
| पुणे मनपा | २१ (अ )<br>कोरेगाव पार्क-घोरपडी | ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय पुणे महानगरपालिका ताडीवाला रोड, बंडगार्डन, पुणे |

सदरचे कामकाज सुरळीतपणे व शांततेत पार पाडण्यासाठी व पुणे पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत कायदा व सुव्यवस्था राखणे कामी सार्वजनिक मालमत्तेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व उपद्रव टाळण्यासाठी वरील नमूद ठिकाणांचे २०० मीटर परिसरात निर्बंध घालणे जरूरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी रविंद्र कदम, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ अन्वये प्राप्त झालेंल्या अधिकारानुसार असा आदेश देतो की, वरील नमूद ठिकाणांच्या २०० मीटर परिक्षेत्रात दिनांक १६/०९/२०१७ चे ००.०१ वा. पासून ते दिनांक २७/०९/२०१७ चे २४.०० वा. पर्यंत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

१) उमेदवारी नामनिर्देशनपत्र दाखल करताना वरील ठिकाणी उमेदवारासोबत ०४ पदाधिकारी किंवा सुंचक/कार्यकर्ते यांच्या व्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीस आत जाण्यास मनाई करण्यात येत आहे.

२) वरील ठिकाणी कोणताही प्रचार करण्यास, सभा घेण्यास व कोणतीही घोषणाबाजी करण्यास मनाई करण्यात येत आहे.

३) वरील ठिकाणी ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यास मनाई करण्यात येत आहे.

४) वरील ठिकाणी कोणताही मजकूर लिहिण्यास अगर छापील मजकूर चिटकविण्यास मनाई करण्यात येत आहे.

५) वरील ठिकाणी नामनिर्देशन पत्र भरण्यासाठी जात असताना निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयापासून १०० मिटरचे आत ३ वाहने घेऊन जाण्यास परवानगी आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दिनांक १५/०९/२०१७ रोजी दिला आहे.

जा.क्र.वि.शा./निवडणूक/ ८५५० /२०१७
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा कार्यालय,पुणे
दिनांक :- १२/०९/२०१७

**विषय** :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश.

**आदेश**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग, पत्र क्रमांक रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.४२/का.५ दि.०६/०९/२०१७ च्या आदेशान्वये बृहन्मुंबई,पुणे,नागपूर व कोल्हापूर या ०४ महानगरपालिकांचा रिक्त पदांसाठीचा पोटनिवडणूक ऑक्टोबर २०१७ कार्यक्रम जाहीर केलेला आहे. व त्यात पुणे महानगरपालिकेच्या प्रभाग २१ (अ) ची पोटनिवडणूक होणार आहे. त्याची आचारसंहीता दिनांक ०६/०९/२०१७ रोजीपासून ते निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अस्तित्वात राहील. पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील कोरेगाव पार्क, मुंढवा, हडपसर या पोलीस स्टेशन हददीतील प्रभाग २१ (अ) कोरेगाव पार्क-घोरपडी या प्रभागाची पोटनिवडणूक होणार असून, दिनांक ११/१०/२०१७ रोजी मतदान व दिनांक १२/१०/२०१७ रोजी मतमोजणी होणार आहे.

आणि ज्याअर्थी आचारसंहिता सुरु झालेपासून, मतमोजणी पुर्ण होईपर्यंत पुणे शहरात निवडणूक सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये खालील बाबींना निर्बंध घालण्याची आवश्यकता आहे. अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी रविंद्र कदम, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कोरेगाव पार्क, मुंढवा, हडपसर या पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रात दिनांक १५ /०९/२०१७ रोजी रात्रौ ००.०१ वा पासून ते दिनांक १२/१०/२०१७ चे २४.०० वा पर्यंत खालील आदेश देत आहे.

१) निवडणूकीचे कालावधीत प्रचाराच्या अनुषंगाने कोणत्याही परिस्थितीत एकावेळी तीन पेक्षा अधिक वाहने एका ताफ्यात चालवू नयेत. तसेच दोन ताफ्यातील अंतर हे १५ मिनीटांचे असावे.

२) सदरचा आदेश संरक्षण वाहनांच्या ताफ्यासह केंद्र किंवा राज्य शासनाचे मंत्री किंवा उच्च पदस्थ व्यक्ती घेवून जात असेल तेव्हा त्यांच्या सुरक्षिततेविषयी लागू असलेल्या आदेशास अधिन राहून अंमलात राहिल व शासकीय कामावर असलेल्या वाहनांच्या संदर्भात लागू राहणार नाही.

सदर आदेशाचा उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहिल.

सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज रोजी १५/०९/२०१७ रोजी दिला आहे.